FYBA II / Marathi / 250

**Q.P. Code :02643**

**[वेळ : तीन तास]** **[गुण :१००]**

Please check whether you have got the right question paper.

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

**प्र.१** अ) 'नापास मुलांची गोष्ट' मधील 'वाटेवरच्या सावल्या' व 'शंभरपैकी शून्य मार्क' या लेखामधील कुसुमाग्रज व ना.सी. फडके या साहित्यिकांच्या बालवयातील अनुभवाचे तुमच्या शब्दात विवेचन करा. **२०**

**किंवा**

आ) "महात्मा गांधी यांना बालपणापासून इतरपेक्षा वेगळी व साधी जीवनशैली प्रिय होती". या विधानाची 'दुस-या वेळी पास झालो' या लेखाच्या आधारे चर्चा करा.

**प्र.२** अ) दया पवार आणि वाय. सी.पवार याचे कोणते अनुभव 'नापास मुलांची गोष्ट' मधील लेखामधून शब्दबद्ध झाले आहेत? **२०**

**किंवा**

आ) सुशीलकुमार शिंदे आणि यशवंतराव गडाख याच्या राजकीय वाटचालीतील प्रारंभीच्या आठवणीचे विवेचन 'कोठे होतो कोठे आलो' व 'प्रारंभ' या लेखाच्या आधारे करा.

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा. **१०**

अ) सी. रामचंद्र याची संगीत आराधना.

आ) 'पन्नास पैकी शून्य मार्क' मधील शांता शेळके यांचा शालेय अनुभव.

इ) चंद्रशेखर धर्माधिकारी याचा भाषानानुभव

ई) 'नापास मुलांची गोष्ट' मधील अनुभवाचा प्रामाणिकपणा

**प्र.४** अ) तुमच्या गावात आदर्श युवा मंडळाच्या वतीने व्यायामशाळा स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त लिहा . **१०**

**किंवा**

आ) शेतक-याच्या शेती उत्पादनास योग्य तो हमीभाव मिळत नाही. त्याची कारणे शोधून त्यावर उपाय शोधण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीचे अहवालात्मक इतिवृत्त तयार करा.

**प्र.५** अ) तुमच्या आवडत्या मोबाईल कंपनीची जाहिरात वर्तनापत्रासाठी तयार करा. **१०**

**किंवा**

आ) तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही एका सौंदर्यप्रसाधनाची वर्तनापत्रसाठी जाहिरात तयार करा.

**पुढे पहा**



9FE72D2B8ADCF4B906821709A2B69421

**प्र.६** पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहा. १०

अ) मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निर्सगाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही, असे म्हणावयाला पाहिजे. सुंदर चित्र पहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती पहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंताची जरुरी आहे. कलावंताच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंताच्या डोळ्यांनी समाज पाहत असतो आणि कलावंताच्या बुद्धीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षाच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलवंताच्या द्यायला पाहिजे. कलावंताची कला ही समाजासाठी आहे; आणि कलावंतावाचून समाज हा सर्वस्वी असहाय्य आहे.

प्रश्न :

१) लेखकाला कोणाची कीव करावीशी वाटते?

२) कलावंताच्या आयुष्याचे कोणते ध्येय आहे?

३) समाजाला कलेची आणि कलावंताची गरज का आहे?

४) मानवजातीच्या प्रगतीचे श्रेय कोणाला द्यावे लागले?

५) कलावंतावाचून समाज हा सर्वस्वी असहाय्य आहे, असे लेखकाला का वाटते?

**किंवा**

आ) भाषा ही समाजजीवनाला अपरिहार्य आहे, याबद्दल वाद नाही. किंबहुना,एकच भाषा वापरून एकत्र व्यवहार करणारे लोक म्हणजेच समाज, हे लक्षात घेतले म्हणजे समाज या शब्दाच्या ज्या इतर अनेक व्याख्या त्याच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्याच्या अनुरोधाचे आपण करतो त्या सर्वाच्या मुळाशी एकभाषिकतव हे महत्त्वाचे तत्व आहे, हे आपणांला दिसून येईल. वस्तुत कोणत्याही कारणाने एकत्र येणारे लोक त्या कारणापुरते एका समाजाचे घटक आहेत असे मानले पाहिजे पण अशा रीतीने एकत्र येऊन व्यवहार करणे हे सुद्धा या सर्व लोकांची भाषा एकच असल्याशिवाय किंवा सर्वांना समजणारी अशी कोणतीतरी भाषा प्रत्येकाला आल्याशिवाय किंवा (काही अपवादात्मक प्रसंगी) दुभाषाची मदत घेतल्याशिवाय शक्य नाही. नैमित्तिक कारणासाठी थोडावेळ एकत्र येणाऱ्याची जर ही गत असेल तर ज्यांचे जीवन परस्परावलंबी आहे आणि बहुताशी सहवासात व्यतीत होते, त्याची गोष्ट तर बोलायलाच नको.

समाजात राहून व्यक्तीला सुखासमाधानाने जगायचे असते, आपल्या आकांक्षा सफल करून घ्यायच्या असतात., इतरांशी सहकार्य करून स्वार्थ आणि परमार्थ साधायचा असतो. ही सामाजिक चौकट कधी कधी व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येत असली तरीही व्यक्तिविकासाला आणि व्यक्तीचे अस्तित्व टिकावायालाही ती आवश्यक आहे. भाषा हा व्यक्तिव्यक्तीतला आणि व्यक्ती आणि समाज याच्यातला दुवा आहे. स्वत:चे व्यक्तित्व इतराच्या नजरेला आणून द्यायचे माणसाचे पहिल्या दर्जाचे साधन आहे. हे साहित्यात जितके खरे आहे तितकेच व्यवहरातही खरे आहे, म्हणूनही व्यक्तिदर्शन आणि व्यक्तिविकास याचे हे साधन सर्वांना आधी

**पुढे पहा**



9FE72D2B8ADCF4B906821709A2B69421

स्वाधीन करून घ्यावे लागते. ते ज्याला स्वाधीन करून घेता येते तो समाजाचा कर्तृत्ववान घटक बनू शकतो. या कारणामुळेच जन्माधांलाही जी अडचण समाजात वावरताना येत नाही ती जन्मबधीर म्हणजे मुक्या माणसाला येते. दृष्टी शाबूत असलेल्या साकार इद्रीयागोचार सृष्टीचा प्रत्यय येऊ सकतो हे खरे असले, तरी दृष्टी

हे ग्रहणसाधन आहे, विनिमय साधन नाही. निदान परंपरा तरी तशी आहे. ध्वनीग्रहण करू शकणारा आणि त्याचे व्यवहारसुलभ अनुकरण करू शकणारा माणूस इतर माणसाशी बोलू शकतो आणि त्यामुळेच समाजाचा प्रभावशाली घटक बनू शकतो.

प्रश्न :

१) भाषा आणि समाज याचे नाते कसे आहे?

२) व्यक्तीच्या दृष्टीने भाषेचे महत्त्व काय आहे?

३) बोलणारा माणूस समाजाचा प्रभावशाली घटक कसा असतो?

४) कोणती सामाजिक चौकट व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येते?

५) व्यक्ती आणि समाज यांना जोडण्याचे कार्य कोण करते?

**प्र.७** पुढील उताऱ्याचा सारांश लिहा. १०

शिल्पकला ही अत्यंत प्राचीन अशी कला आहे. पूर्वी मूर्तिकार अशी संज्ञा अधिक प्रमाणात यायची. राजेराजावाडयाच्या, मोठ्या आदरणीय व्यक्तीच्या मूर्ती तयार करण्याचे काम हे मूर्तिकार करीत. त्यासाठी ते पाषाण, संगमरवर, लाकूड, तांबे, पितळ, पंचधातू, सोने, चांदी इत्यादीचा वापर करीत. आजही ही प्रथा कायम आहे. आणि या मूर्तीमधून संवाद साधण्याची किंवा पुनःप्रत्ययाचा आनंद देण्याचीच प्रक्रिया होते. अलीकडच्या काळात शिल्पकार हा शब्द अधिक प्रमाणात वापरला जातो. परंतु त्या काळात कोरीव लेणी तयार करणारे कलाकार हे तसे मूर्तीकाराचा होते. अगदी रामायण-महाभारताच्या काळातही दिवंगत व हयात असणाऱ्या मंडळीच्या प्रतिमा - मूर्ती- शिल्प बनवण्याची प्रथा होती असे दिसते. राजधान्यांच्या मोक्याच्या ठिकाणी, राजप्रसादामध्ये निरनिराळ्या प्रकारचे पुतळे उभे करून, त्या जागा सुशोभित करणे वा त्या त्या दिवंगत व्यक्तीचे स्मरण, त्याच्याबद्दलच्या भावभावनांना उजाळा देऊन त्याची स्मृती कायम जागृत ठेवण्यासाठी ही शिल्पकृती वापरली जात असे. आजही राजधानी दिल्लीसारख्या शहरात, मुंबईसारख्या व्यापारी शहरात, कलकत्ता, मद्राससारख्या महानगरामध्ये अनेक मान्यवरांचे पुतळे - शिल्प उभारलेली दिसतात. अशा पुतळ्याच्या उभारणीमागे त्या व्यक्तीच्या जीवनकार्याची सतत आठवण होत राहावी हाच हेतू असतो.

**किंवा**

ब) इंद्रीय -निग्रह - पूर्वक आपल्याला जे निश्चितपणे वाटते त्या आपल्या मताचा प्रचार करणे योग्य आहे, पण अशा प्रकारचा प्रचार करण्याचे खरे साधन आचार, उच्चार नव्हे. उच्चाराने मतप्रचार करू पाहणे हा मोहाचा होय. हा मोह आपल्यात फार आहे. आपले मत जर खरे असेल, तर आपण त्याप्रमाणे वागल्याने त्याचा आपोआप प्रचार होईलच. आपला सत्यावर विश्वास असला पाहिजे. सत्यामध्ये स्वत:चा प्रचार करण्याची स्वयंभू शक्ती आहे. सत्य सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशी आहे. सूर्य जसा झाकले जात नाही. आचरण टाकून बाह्य उपायांनी

**पुढे पहा**



9FE72D2B8ADCF4B906821709A2B69421

प्रचार करण्याचा प्रयत्न फुकट आहे. त्याचा काहीच परिणाम होऊ सकट नाही. त्याने हिंसा वाटते आणि असत्याचा प्रचार होतो. प्रचारालाही मर्यादा आहे. सूर्याची प्रचारक शक्ती किती जबरदस्त आहे ! पण तोही मर्यादा सांभाळून असतो. त्यामुळे तो दुनिनेचा 'मित्र' राहून प्रचारही करू शकतो. दार बंद कारण कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशी येऊन उभा राहतो. पण दाराला धक्का देऊन आत शिरत नाही. मात्र जरा दार किलकिले झाले की सबंधाच्या सबंध आत शिरलाच. ही प्रचाराची मर्यादा होय. आपले मत सत्य असले तरी त्याचा स्वभाविक प्रचार, आचरणाचे मौन सुटले की हिसा दाखल होते आणि हिंसा दाखल झाली की, सत्य उडालेच. पाण्याने जसा अग्नी विझतो, तसे हिंसाने सत्य विझते. आणि आचरण टाकून प्रचार करण्याचा प्रयत्न म्हणजे नागडी हिंसाच. प्रचाराची घाई हीही हिंसाच, आणि शिवाय अश्रद्धा, अज्ञान तर खरेच, किंवा दंभ का म्हणू नये? लहान मुले बी पेरतात आणि जरा अंकुर फुटला की तो लवकर उगवावा म्हणून त्याला वर उपटतात. तसेच हे.

प्र.८ पुढील पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १०

१) सिमेवरील सैनिकाची आत्मकथा

२) भ्रष्टाचाराचा भस्मासुर

३) लोकल बंद पडली तर.....

४) पुस्तकाचे आत्मवृत्त

---



9FE72D2B8ADCF4B906821709A2B69421